एस.एन.जे.बी. आश्रम संचलित,

कर्मवीर के.ह.आबड कला, श्रीमान मो.गि.लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच.जैन विज्ञान महाविद्यालय चांदवड जि.नाशिक

# मोडी लिपी अहवाल

पुराभिलेख संचालनालय व आबड कला,लोढा वाणिज्य व जैन विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग **दि. २७/०९/२०१८ ते ०६/१०/२०१८ या कालावधीत** आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी मराठ्यांच्या इतिहासाचे अभ्यासक श्री. दत्ताजी नलावडे हे प्रमुख अतिथी म्हणून होते, तसेच श्री. सर्जेराव वाडकर, श्री. दिनकर पाटील श्री. कैलास लोखंडे इ. पुराभिलेख विभागातील अधिकारी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एच.जैन उपप्राचार्य प्रा.डॉ. डी.एन शिंपी, डॉ. एस.एस. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.संदीप पगार यांनी केले, प्राचार्य डॉ.जी.एच. जैन यांनी श्री. दत्ताजी नलावडे यांचा सत्कार केला तसेच पुराभिलेख विभागातून आलेल्या अधिकाऱ्यांचा देखील सत्कार करण्यात आला. मोडी लिपी संशोधनासाठी किती महत्वाची आहे. याचे महत्व या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आले.

मोडी लिपी प्रशिक्षण वर्गासाठी एकूण १५७ प्रशिक्षणार्थीनी सहभाग घेतला यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. तसेच तालुक्यातील मोडी लिपी अभ्यासकांनी देखील सहभाग घेतला. त्याचप्रमाणे नाशिक विभागातील जळगाव, अ.नगर, धुळे, नंदुरबार इ. जिल्ह्यातील वेगवेगळ्या शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी या वर्गात सहभाग घेतला. १० दिवस मोडी लिपीचे प्रशिक्षण देण्यात आले, श्री. दिनकर पाटील व श्री. कैलास लोखंडे हयांनी प्रशिक्षक म्हणून काम पहिले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ११ व्या दिवशी परीक्षा घेण्यात आली. परीक्षेचे संपूर्ण कामकाज पुराभिलेख विभागानेच केले.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर समारोप समारंभ साजरा करण्यात आला. या समारोप समारंभासाठी तालुक्याचे विधानसभा सदस्य डॉ. राहुल आहेर (आमदार) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. श्रीमानसा बेबिलालजी संचेती, अजितभाऊ सुराणा, कांतीलालजी बाफणा, महावीरजी पारख इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संदीप पगार यांनी केले. प्राचार्यांनी प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन केले, सूत्रसंचालन डॉ. तुषार चांदवडकर यांनी केले तर आभार श्री. कांतीलालजी बाफणा यांनी मानलेत. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी.एन. शिंपी, प्रा.डॉ. एस.एस. पाटील, व प्रा. श्रीमती व्ही.आर. जाधव, प्रा. आर. जे. इंगोले, डॉ. सी. के. कुदनर, श्री. संदेश बुरड, श्री. निर्मल जैन, प्रा. पी. यु. वेताळ, प्रा. बी .एच. भामरे, प्रा. डी. के. केदारे, प्रा. एस. एम. सोनवणे, प्रा. पी. डी. सोनवणे, प्रा. के. पी. भदाणे तसेच श्री. मुरली शिंदे, श्री. काटे, श्री. शिवदास ईशी, श्री. चीतनर इ. शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग उद्घाटनाप्रसंगी मा. दत्ताजी नलावडे, मा. सर्जेराव वाडकर, डॉ. संजय शेलार, मोडी लिपी प्रशिक्षक मा.विनायक पाटील, मा. कैलास लोखंडे, प्राचार्य डॉ. जी. एच. जैन इ.




मोडी लिपी प्रशिक्षणासाठी उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थी व मोडी लिपी शिकविताना प्रशिक्षक मा. कैलास लोखंडे.




मोडी लिपी प्रशिक्षण वर्गात प्रशिक्षकांना प्रश्न विचारताना प्रशिक्षणार्थी




मोडी लिपी प्रशिक्षणासाठी उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थी व मोडी लिपी शिकविताना प्रशिक्षक मा. विनायक पाटील.




मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग समारोप समारंभात मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एच. जैन व व्यासपीठावर उपस्थित मा. आमदार डॉ. राहुल आहेर, डॉ. आत्माराम कुंभार्डे, संस्थेचे अध्यक्ष श्रीमानसा बेबिलालजी संचेती, अजितजी सुराणा, कांतीलालजी बाफणा, महावीरजी पारख इ.